जनसंपर्क अधिकारी
मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

प्रेसनोट क्र. १५६-२३ दिनांक :- १६/०५/२०२३

# जबरी चोरी करणारे ३ आरोपी अटक करुन एकूण २७ मोबाईल्स व ऑटो रिक्षा असा २,९६,००० /- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत. काशिमिरा पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटीकरण पथकाची कामगिरी.

-------oooo---------

काशिमीरा पोलीस ठाणे हद्दीत फिर्यादी नामे श्री. देव गोपी शर्मा, वय ३० वर्षे, व्यवसाय नोकरी, रा. रुम नं ०८, ए विंग, न्यु समीर, जैसल पार्क, भाईंदर पुर्व हे दिनांक ०३.०५.२०२३ रोजी १९.०० वा.चे सुमारास डॉन बॉस्को स्कुलकडे जाणाऱ्या वळणावर, आले असता रिक्षामधुन ३ अनोळखी इसमांनी येवुन फिर्यादी यांना सही है वो असे बोलुन फिर्यादी यांचे गालावर चापट मारुन त्यांचे खिशातील Redmi कंपनीचा 5A मॉडेलचा सिल्व्हर रंगाचा मोबाइल फोन जबरीने चोरी करुन नेले बाबत काशिमिरा पोलीस ठाणेत गु.र.क्र. ३३२/२०२३, कलम ३९२, ३४ भा.दं.वि.सं. अन्वये नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्हा उघडकीस आणण्याच्या अनुषंगाने गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अधिकारी व अंमलदार हे गुन्हे प्रतिबंधक गस्त करीत असताना मिरारोड पुर्व वेर्स्टन हॉटेलकडुन हाटकेश कडे जाणारे रोडवर आरोपीत हे ऑटो रिक्षा क्र. एम.एच. ०४ डी २४६७ मध्ये संशयास्पदरित्या वावरत असताना आढळून आल्याने गुन्हे प्रकटीकरण पथकाने नमुद रिक्षाचा पाठलाग करुन १) इरशाद अब्दुलरौफ अन्सारी, वय ३० वर्ष, व्यवसाय टाइल्स मिस्त्री, रा. हमीद की चाळ, नालापार्क, दिवानशहा दर्गाच्या मागे भिवंडी, जिल्हा ठाणे. २) मोहसीन मेहमुद खान, वय २६ वर्ष, व्यवसाय हामाली, रा. जैतुनपुरा, कॉटरगेट मस्जीदच्या मागे, ता.भिवंडी, जिल्हा ठाणे. ३) शाहीद अख्तर अन्सारी, वय २७ वर्ष, व्यवसाय रिक्षा चालक, रा. जैतुनपुरा, मंगलबजार स्लॅब, एकता हॉटेलच्या समोर, भिवंडी, ता.भिवंडी, जिल्हा ठाणे यांना ताब्यात घेवुन त्यांच्या रिक्षाची झडती घेतली असता नमुद रिक्षाचे प्रवासी सिटच्या मागे एक काळया रंगाच्या सॅक बॅगेत विविध कंपन्याचे एकूण २७ मोबाईल फोन मिळुन आले. सदर मोबाईल फोन व ऑटो रिक्षा ही पुढील तपासकामी ताब्यात घेवुन चौकशी केली असता त्यांचेकडे मिळुन आलेल्या मोबाईलपैकी Redmi कंपनीचा 5A मॉडेलचा सिल्व्हर रंगाचा मोबाईल फोन हा वरील नमुद गुन्हयात जबरी चोरी केलेला असल्याचे निष्पन्न झाले. उर्वरित मोबाइल्सबाबत अधिक तपास सुरु आहे. तसेच आरोपीताच्या ताब्यात मिळुन आलेली ऑटो रिक्षा क्रमांक एम.एच.०४ डी २४६७ ही काशिमीरा पोलीस ठाणे, गु.र.क्र. ३०९/२०२३ कलम ३७९ भा.दं.वि.सं या गुन्हयात चोरीस गेलेली असुन सदरची रिक्षा आरोपीत नामे १) इरशाद अब्दुलरौफ अन्सारी, २) मोहसीन मेहमुद खान यांनी चोरी केलली असल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांना दिनांक ०३.०५.२०२३ रोजी अटक करण्यात आली असून सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि प्रशांत गांगुर्डे हे करीत आहेत. अटक आरोपीत हे जबरी चोरी व वाहन चोरी करणारे अभिलेखावरील गुन्हेगार आहेत.

सदर कामगिरी श्री. जयंत बजबळे, पोलीस उप आयुक्त परिमंडळ ०१, श्री. विलास सानप, सहाय्यक पोलीस आयुक्त, मिरारोड विभाग यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री संदीप कदम, पोलीस निरीक्षक कुमारगौरव धादवड (गुन्हे), सहायक पोलीस निरीक्षक श्री. प्रशांत गांगुर्डे, पोलीस उप निरीक्षक श्री. निखिल चव्हाण, पोलीस उप निरीक्षक (श्रेणी) श्री. प्रकाश कावरे, पो.हवा.सचिन हुले, सुधीर खोत, राहुल सोनकांबळे, पो.अंम. रविंद्र कांबळे, प्रविण टोबरे सर्व नेमणुक काशिमीरा पोलीस ठाणे व पोहवा. जयप्रकाश जाधव नेम. पो.उ.आ. कार्यालय,परिमंडळ १ यांनी केलेली आहे.



---------०००--------